# University of Mumbai

संलग्नता विभाग
ताबडतोब/तात्काळ /हस्ते बटवडा

क्र. संलग्नता/आयसीसी/२०१६-१७/२७

## परिपत्रक

प्रति,
प्राचार्य/संचालक,
सर्व संलग्नित महाविद्यालये,

विषय:- महाविद्यालयाचे संलग्नीकरण व अध्यापकांची मान्यता या प्रक्रियेंचे संगणकीकरण करणेबाबत.
संदर्भ:- क्र. संलग्नता/आयसीसी/२०१६-१७/२३, दिनांक ३० डिसेंबर, २०१६

महोदय/ महोदया,

उपरोक्त विषय संदर्भात मा. कुलगुरू महोदयांनी दिलेल्या आदेशानुसार शैक्षणिक वर्ष २०१६-१७ पासून सर्व संलग्नीत महाविद्यालयांच्या/ संस्थांच्या माहितीचे संगणकीकरणाचे काम सुरू करण्यात आले आहे. सदरील कामाच्या संदर्भात दिनांक ०३ जानेवारी, २०१७ ते ०५ जानेवारी, २०१७ रोजी कार्यशाळा घेण्यात येऊन तद्नंतर संलग्नीत महाविद्यालये तथा संस्थांना लॉगीन आयडी (Login Id) व पासवर्ड (Passward)वितरीत करण्यात आलेले आहेत. तदअनुषंगाने संलग्नीत महाविद्यालयांनी / संस्थांनी आपल्या महाविद्यालयांची माहीती ऑनलाईन सादर करणे अनिवार्य आहे, कारण महाविद्यालयांना विविध समित्या देणे, समित्यांमार्फत अहवाल प्राप्त करणे, विविध मान्यता पत्र पाठविणे इ. सर्व कामे पुढील काळात ऑनलाईन केली जाणार आहेत. **ज्या महाविद्यालयांनी/ संस्थांनी अद्याप पर्यंत त्यांचे ऑनलाईन प्रक्रियेसाठीचे लॉगीन आयडी (Login Id) प्राप्त केले नसतील अशा महाविद्यालयांनी/ संस्थांनी लॉगीन आयडी तात्काळ प्राप्त करून घ्यावेत.**

तसेच सर्व संलग्नीत महाविद्यालये/संस्थांनी **दिनांक ३१ जानेवारी, २०१७ पर्यंत** आपल्या महाविद्यालये/ संस्थांची माहीती ऑन लाइन सादर करून **दिनांक ०४ फेब्रुवारी, २०१७ पूर्वी** शैक्षणिक वर्ष ***२०१७-१८ साठी सादर केलेले सलग संलग्नतेचे प्रस्ताव ऑनलाईन (online) पुन:श्च सादर करणे अनिवार्य आहे, याची सर्व संबंधीत प्राचार्य/ संचालकांनी नोंद घ्यावी.***

25/1/17.

मुंबई - ४०० ०३२.
२५ जानेवारी,२०१७

(डॉ. एम. ए. खान)
कुलसचिव